## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ५४२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२८/०८/२०१६

**१) जुन्या भांडणावरुन लोखंडी रॉडने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. . :–**

दिनांक २६/०८/०१६ रोजी ११.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी विश्वनाथ वासुदेव बांडेबुचे वय ३४ वर्ष, रा. रोहा ह. मु. मोहाडी हा आपल्या ट्रॅक्टर दुरुस्तीचे काम करीत असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन जुने भांडणा वरुन फिर्यादी जखमी जवळ येवुन भांडण करुन आरोपी क्र. ०१ ने लोखंडी रॉडने फिर्यादीचे डावे हाताचे मनगटावर, अंगठीवर, कमरेवर मारुन जखमी केले असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२५,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गि–हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**२) लाकडी ऊबारीने मारहान करुन जखमी केले . :–**

दिनांक २६/०८/२०१६ चे १०.०० वा. दर यातील फिर्यादी हेमराज गोविंदा तुमडाम वय ४० वर्ष, रा. पोहरा हा मोहल्यातील हनुमान मंदीराच्या पायरीवर बसला असता यातील आरोपीने आपल्या हातात लाकडी ऊबारी घेवुन फिर्यादी जवळ येवुन तु जादुखोर आहे. तु माझ्यावर जादुटोना केल्यामुळे माझी प्रकृती बिघडते असे म्हणुन लाकडी ऊभारीने फिर्यादीचे उजवे हाताचे दंडावर (भुजेवर)मारुन दुखापत केल्याने फिर्यादी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४ भादंवि. सहकलम २(१)(ख)(७)म. जा. प्र. कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २५/०८/२०१६ रोजी १०.४५ वा. दर. यातील मृतक अशोक झिटुजी लोखंडे वय ४२ वर्ष, रा. विरली याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधेपचारा करीता ग्रा. रु. पवनी येथे नेले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. पवनी येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कंगाले पो. स्टे. लाखांदुर येथे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोना. गि–हेपुंजे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४)अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक २७/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, मोहाडी, कारधा, करडी, वरठी, तुमसर, सिहोरा, आंधळगांव, साकोली, पवनी, अडयाळ, व दिघोरी येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण २२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २९५ लिटर हातभट्टी+सडवा+साहित्य कि. ९५,७८०/–रू. व ८ लिटर २८० मिली देशी दारु कि. २३०० /–रु. असा एकुण ९८,०८०/–रू. चा माल जप्त करण्यात आला.